मच्छिंद्रनाथ माळी



# बळी

# बळी

मच्छिंद्रनाथ माळी

ई साहित्य प्रतिष्ठान

# बळी (BALI)

कथा

लेखक : मच्छिंद्रनाथ माळी

शिवकृपा निवास. कोमलनगर, पडेगांव , औरंगाबाद.

Email :- mali.machhindranath@gmail.com

Ph : 91-9823615747

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

या कथांतील

सर्व पात्रे,

प्रसंग आणि स्थळे

पूर्णतः काल्पनिक आहेत.

बळी

आज चौदा-पंधरा वर्सं होत असतील.

जव्हा माय मला आजोळी बेलापूरला घेऊन आली, तव्हा मी आसन सात आठ सालचा. बेलापुरातच मी मायच्या कष्टावरच वाढलो, खेळलो अन कसंबसं चार बुकं शिकलो. मागासवर्गीय म्हणुन बांधकाम खात्यात ढंपरचा डायव्हर झालो. सरकारी कामानिमित्त गावोगांव फिरतीवर असायचो. कुठं रोडच्या कामाला तर कुठं धरणाच्या कामाला जावा लागायचं. वडगावच्या धरणाच्या कामावरबी म्या ढंपार घेऊन गेलो होतो.

वडगाव तसं माझं मुळ जल्म गांव!

हे कोणालाबी ठावं नव्हतं. दिवसभर धरणावर ढंपर, टॅक्टरची घरघर, खडखड होत होती. हजारो माणसं उन्हातान्हात मुंग्यासारखी राबत होती. माती उपसत होती. धरणाच्या पाळीवर आणून टाकीत होती. दिवसागणिक धरणाची भिंत आकार घेत होती.

धरणाच्या कामाला आज बाजारचा दिवस असल्याने सुटी होती.

समदी निरवा नीरव झाल्यावर म्या सहज गावात गेलो. डोळ्यापुढं वडगावचा ओस पडल्याला भकास बुध्दवाडा दिसत होता. जुनाट मोडकळीला आल्याली काही घरं कसातरी तोल सावरुन आज पडू का उद्या पडू, या  ईचारात उभी होती. कांही घरं तर जमीनदोस्त होऊन भुईसपाट झाली होती.

जुन्या आठवणीनं अंतःकरण मळभ भरल्या आभाळागत भरुन आलं.

मन भूतकाळात कधी सरपटत गेलं हे समजलंच नाही.

नकळत पंधरा वरसा अगुदरचा वडगाव मह्या नजरापुढं तरळू लागलं.

किती खेळीमेळीचं वातावरण होतं तवा गावात ? गावचं बारा बलूतं, सगळे खाऊन पिऊन सुखी समाधानी होते. गावकरीबी बुध्दाला कधी हीन समजत नव्हते. गावच्या लोकांनीच पुढाकार घेऊन मोठ्या आपुलकीनं बाबासाहेबांचा पुतळा उभा केला होता. कोणाच्याही अडल्या नडल्या कामाला परतेक जण जात पात इसरून धाऊन यायचा. गावात कोणाच्याबी घरी लगन कार्य असलं तर आम्ही उघडे नागडे, ढेबरी, शेंबडी पोरं तर पोट फुटेस्तोवर खायचो. वर आणखी घरीबी आणायचो. 'तुळशीचं लगन' कधी लागतं आणि लगनसराई कव्हा सुरू होती याची आम्ही आतुरतेने वाट पाहायचो. लगनसराई आम्हाला जणू ती सुगीच वाटायची.

लगनसराईच्या नुसत्या आठवणीनं बी आमच्या जिभेवर गेल्या सालच्या बुंदी, लाडूची चव रेंगाळायला लागायची. सणावाराच्या दिशी मायच गावातून मागून आणायची. मायनं मागून आणलेल्या अन्नावर म्या अन हौशी तुटून पडायचो. असाच एकदा पोळयाच्या सणाला मायनं मला पाटलाच्या वाड्यावरून मागून आणायला सांगितले. तव्हा 'म्या नाही जात, मला लाज वाटतीया' म्या मान वाकडी करीत म्हणलो. तर मायनं मला 'लाज वाटतीया त वाण्या-बामनाच्या घरात का पैदा झाला नाही? असं म्हणत तरवडाच्या फोकाटीनं मला चांगला हिरवा-पिवळा होईस्तोर झोडपलं. हौशीनं मातर मधल्या मधी मोठमोठ्यानं रडून उगाच दारी कलमा केला. त्या दिवशी कोणीच जेवलं न्हाई.

एक येळेस शेजारच्या गावात भंडारा होता. म्या अन हौशी गेलो तर मागणाराची ही तोबा गर्दी. म्या तर गर्दी पाहूनशान हादरूनच गेलो. म्या बाजुला उभा राहायलो. हौशीनं मातर चिकाटी सोडली न्हाई. फाटका इटका परकर सावरीत, केसाच्या झिंज्या मागं करीत पाण्यात शिरावं तसं ती गर्दीत शिरली. घटक्याभरानं परकराच्या वटीत भलीमोठी बुंदी घेउन आली. आम्ही एका झाडाखाली बसलो. पोटभर बुंदी खाल्ली. उरलेली फडक्यात बांधुन घराच्या वाटाला लागलो.

चालता चालता बुंदीचं गठूडं माह्या हातून कसं निसटलं काय माहीत?गठूडं खाली पडलं अन गाठ सुटून सगळी बुंदी फुफाट्यात पांगली. हौशी मह्याशी खूप भांडली, म्हणून म्या फुरंगटून बसलो. ती पुन्हा घरी जाण्यासाठी माह्या इनवण्या करू लागली. अंधार पडता पडता आम्ही घरी आलो.

माय आमची वाटच पहात होती. आम्ही रिकाम्या हातानं आल्याचं पाहून हौशीवर माय डाफरलीच. 'रंडके, काळं त्वांड घेउन रिकाम्या हातानं घरी आलीस तरी कशाला? तिकडंच तुझं काळं-पांढरं का न्हाई केलं? असं म्हणत तिनं हौशीला काठीखाली काळीनिळी होईस्तोर मारलं.

मला लइ वंगाळ वाटलं. म्या केलेल्या चुकीबद्दल हौशीनं एक शबुद बी न बोलता मुकाट्यानं मायचे झोडपे खाल्ले. ती बाहेरच मुसमुसत बसली. माय घरात कामाला लागली. मला लइ गलबलून आलं.

म्या तिच्या जवळ गेलो. तिला घरात नेण्यासाठी तिचा हात धरला तर काय,मला चटकाच बसला. तिच्या अंगात सनसनून ताप भरला होता. म्या तिला घरात नेऊन वाकळीवर झोपवली.

पाचवा दिवस उजाडला तरी तिचा ताप जराबी उतरला न्हाई. बा नं शहरातून डागतर आणला,पण त्यानं पाहून सांगितलं,'फार उशीर झाला,केस हाताबाहेर गेली'.

दुसऱ्याच दिवशी हौशी समदे मायापाश तोडून देवाघरी निघून गेली. कालऱ्यानं तिचा बळी घेतला होता. मला मातर म्याच तिचा अपराधी असल्यासारखं वाटत होतं. मायलाबी लई वाईट वाटत होतं. 'म्याच पोटकरपीनं पोरीचा जीव घेतला 'म्हणून ती जिवाला सारखी खाई.

हौशी गेली आणि मायच्या वागण्यात जमीन-अस्मानचा फरक पडला. तिनं जणू 'धरी ना शस्त्र करी 'अशी प्रतिज्ञाच केली. दिवसभर पाटलाच्या शेतावर राबायची, सोंगणीच्या कामाला जायची. बा बी रोजंदारीनं काम करायचा. म्याबी नेमानं शाळेत जायचो. एक दिवस म्या असाच घराम्होरं पाटीवर लिहीत बसलो होतो. समुरच बाबासाहेबाचा पुतळा दिसत होता. सुका साळव्याचा जग्या उगाचच चाळा म्हणून खडे-गोटे फेकीत होता. असाच त्याने फेकलेल्या एका लहानशा दगडाने बाबाबासाहेबाचं नाक फुटलं. जग्याला वाटलं हे कोणी पाह्यलच नाही. रातच्याला बा घरी आल्यावर बा ला हे सांगितलं.

शहरात नुकतीच 'नामांतर चळवळ 'पेटल्याली होती. खेड्यापाड्यातून विखुरलेल्या दलितांचे लोंढे शहराकडे धाव घेत होते. मिळेल ती मदत लाटीत होते. दुसऱ्या दिवशी सकाळीच शहरातून एक सुटबूटवाला,दाढी वाढविलेला पुढारी अन केरबाच्या

घराम्होरं समदी माणसं जमली. बा मातर सकाळच्च्यालाच कामावर गेला होता. खलबतं होऊ लागली, उलटसुलट चर्चा झाली. दलितांच्या भावना दुखवल्या, गावकऱ्यापासून दलितांच्या घरादाराला व जिवाला धोका असल्याचा अर्ज पोलिस ठाण्यावर देण्याचं एकदिलानं ठरलं. अन त्याच दिवशी संध्याकाळी पोलिस चवकशीला गावात दाखल झाले.

बानं मातर 'खरी घटना कशी घडली' हे पोलिसाला सांगितलं. पुढाऱ्याचा आणि शहराकडे जायला आसुसलेल्या पाखंडी लोकांचा डाव सपशेल आपटला.  गावकऱ्यांना बा इषयी खुपच आपुलकी वाटू लागली. 'भिवा चव्हानानं सत्य उजेडात आणलं म्हणून गावावरचं इघीन टळलं बाबा!' असं पुटपुटत सुटकेचा सुस्कारा टाकला. त्या दिवसापासुन मातर दलिताबद्दल गावकऱ्यांच्या मनात अढी पडली. तेढ निर्माण झाली. घृणा वाटू लागली. पण बा ला मातर कोणी दूर लोटलं नाही, कोणी अंतर दिलं नाही.

दत्तु पाटलाच्या पोरीचं, सिंधूचं लगन तोंडावर आलं होतं. म्हणून त्यांनी बा ला सकाळीच सरपण फोडायसाठी बोलावलं होतं. बा चं जेवणबी वाड्यावरच झालं. दिवसभर लाकडं फोडून दमलेला बा दिस बुडायच्या वकुताला घरी आला. बा घरात बसत नाही तोच पोलीसांनी घराला गराडा घातला. गांजाचा धंदा करतो म्हणूनशान दोन-तीन पोलिस घरात घुसले व झडती घेतली. धुडक्यात बांधलेल्या गांजाचा पोलीसांनी पंचनामा केला.

एवढ्यात माय कामावरून परतली. समुर हे वाढल्यालं वाढाण पाहून तर ती मटकन खालीच बसली. बानं गांजा बांधल्यालं धडूत दादू अभंगच्या कमळीच्या जुन्या परकराचं होतं हे मनातल्या मनात वळखीलं होतं. आपल्याच माणसांनीच आपला घात केला होता. घराच्या उघड्या धुराड्यावाटं गठूडं आपल्यावर हे बालंट आणलं होतं. पण बा काहीच बोलला नाही. बा ला बेड्या घालुन पोलीस घेउन गेले. दुसऱ्या दिवशी पाटलानं मोठ्या मिनतवारीनं बा ची जामिनावर सुटका केली. काम असल्याचा बहाणा करून बा सोबत न येता तिकडंच थांबला. पाटील एकटेच आले. वाट पहातच आम्ही झोपी गेलो.

रात्री बा घरी आलाच नाही. दुसऱ्या दिवशी वडगाव-बोरगाव रस्त्यावरच्या मोठ्या वडाच्या झाडावर बा चं लोंबकळणारं प्रेत गावकऱ्यांना दिसलं. बा नं स्वतःच्या पागुट्यानं वडाच्या झाडावर फाशी घेऊन जीव दिला होता. माणसाच्या दुष्ट भावनांनी बाचा 'बळी ' घेतला होता. सत्त्यासाठीच बा बळी पडला होता. गावकरी खूप हळहळले. सारे जण म्हणू

लागले,'आज बाबांचा एका सच्च्या अनुयायाचा अंत झाला. बाबाच्या चरणी नेमानं बुध्दवंदना म्हणणाऱ्या उपासकाचा सत्त्यासाठीच बळी गेला !

गावकऱ्यांनी मोठ्या श्रध्देने बाबासाहेबाच्या पुतळयाजवळच ' बा ' चा बसवलेला एक लहान पुतळा जणू काही ' सत्य हेच श्रेष्ठ आहे, माणसामाणसात तेढ निर्माण करणारं, दुरावा निर्माण करणारं तत्त्वज्ञान बाबांनी कधीच सांगितलं नाही. माणूस नुसता परिस्थितीनं सुधारून उपेगाचा नाही, तो मनानं सुदीक सुदारला पाह्यजे, तरच खऱ्या अर्थानं बाबांच्या शिकवणुकीचं चीज झाल्यासारखं होईल,सार्थक होईल. ' असं सांगत निश्चल उभा आहे. पुतळयापुढं म्या किती येळ हात जोडून भान हरवून उभा होतो हे मला समजलंच नाही. अंतःकरण ढवाळून निघालं. मन गहिवरून आल. नकळत आसवांची फुलं गालावरून घरंगळून बा च्या चरणावर पडत होती. सायबाच्या हाकेनं म्या भानावर आलो अन जड पावलानं कँपावर परतलो......

*** *** ***

बालंट

गौरी-गणपती आले तसे पाउस न पडताच निघून गेले. आषाढात आदळलेल्या पावसाच्या तुटपुंज्या ओलीवर कोवळी कोवळी पिकं कशीतरी उभी होती. आजारानं लहान मुल कोमेजून जावी तसी दुपारच्या उन्हात कोमेजून जाई. पळाटी-भूईमुगानं तर कवाच कान वर केले होते. पावसाने डोळे वटारले तसे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले ते डोळयातून येऊ लागले. वांझ बाईच्या फुगलेल्या पोटासारखं आभाळात काळे काळे ढग नुसतेच लोंबकळत होते पण पाऊस काही पडत नव्हता. पाऊस आज पडेल उद्या पडेल या भाबड्या आशेनं आभाळाकडं पाहून पाहून माना वाकड्या अन् डोळयाच्या खोबणी झाल्या होत्या. पण वरूण राजाला काही दया येत नव्हती, पाझर फुटत नव्हता. नेटानं तग धरुन उभी असलेली पिकं पावसासाठी तरसून गेली होती. दुष्काळ सदृश वातावरण कोवळया पीकांना जणू वाकुल्या दाखवत होतं.उगवणारा प्रत्येक दिवस अधिकच धुळधान करून मावळत होता.

बोरवाडी शिवारात दुष्काळाच्या तांडव नृत्याला सुरुवात झाली. विहिरीच्या पाण्यानं तळ गाठले होते. अर्धवट भरलेल्या पव्हर्यानं काढलेल्या गढूळ पाण्यावर गावाचं कसंनुसं भागत होतं. गावच्या शिवारातून वाहणाऱ्या सिंदी नाल्याचा ' विरोळयाचा डोह ' तर केव्हाच कोरडा-ठाक पडला अन् लोकांना गुराढोरांच्या पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला. प्रत्येक जण चिंताग्रस्त होता पण यावर तोडगा मात्र सापडत नव्हता.

बाजरीचं सुकलेलं कोवळया पिकाकडं पाहून आनंदा धुमाळ हवालदील झाला होता. हताश होउन शेताच्या मेरावर बसला होता. विचारांचं वादळ त्याच्या डोक्यात उठलं होतं. पाहता पाहता भुतकाळातला तो प्रसंग त्याच्या डोळयासमोर तरळू लागला.....

दोन वर्षांपूर्वी ' आपल्या मागास भागाचा विकास ' व्हावा म्हणून तळमळीनं कार्य करणारे नवनिर्वाचित आ.रावसाहेब खनाळे पाटलांनी कळकळीने कार्य करून 'शेतीला पाणी मिळावे ' हे गाऱ्हाणे पोटतिडीकीने सरकारी दरबारी मांडून, भांडून तंडून ह्या भागात जलसिंचन पाणी योजना पदरी पाडून घेतली होती.' तळमळीनं कार्य करुन खऱ्या अर्थाने

लोककल्याण करणारे ' म्हणून त्यांचा नावलौकीक होता. रात्रंदिवस तळमळीनं लोकसेवा करणारे आमदार खनाळेंची वाढती लोकप्रियता पाहून बोरवाडीचे सरपंच सुभानराव शहाणेच्या उगीचच पोटात दुःखू लागायचे.लहान सान गोष्टीचं भांडवल करून आमदारावर आगपाखड करून तोंडसुख घ्यायची एकही संधी सुभानराव कधीच चुकवत नसे.

गेल्या निवडणुकीत सुभानरावरावानं आपल्याविरुध्द लोकांना बहकावलं अन् गावाचं मतदान आपल्याला मिळू दिलं नाही ह्याचा आ. खनाळे यांना विसर थोडाच पडला होता? पण संकोचीत विचार न करता दुरदृष्टीने आपआपसातले हेवेदावे बाजुला ठेवून ते सरकारने मंजूर केलेल्या जलवाहिनीच्या कामाला ग्रामस्थाकडून संमती मिळवण्यासाठी बोरवाडीत आले होते. अन् आ.खनाळेंना बोरवाडीत पाहून सुभानरावाचं पित्त खवळलं होतं. सुभानराव पाहता पाहता लोकांना बहकावू लागला अन् लोकांना भडकवण्यासाठी नको ते बडबडू लागला.....

'अरे, येड्यांनो ह्या राजकारणी, पाताळयंत्री माणसावर भरवसा ठेउ नका. हा धूर्त माणुस पाईप लाईनच्या कागदपत्रावर आपल्या अडाणी माणसाच्या सह्या अंगठे घेउन आपल्याला कर्ज बाजारी करण्याचा कुटील डाव आहे हा ह्याचा. कर्जाचा डोंगर आपल्या बोडख्यावर होईल अन् मग ते कर्ज आपल्या सात पिढ्यांकडूनही फिटणार नाही. त्या कर्जातच आपण पिचत पडू. अन् शेवटी कर्ज परतफेड झाली नाही म्हणून सरकार आपल्या जमीनी लीलाव करणार. मग आपण भूमीहीन होऊन लाचार बनून दुसऱ्या पुढे हात पसरायची वेळ आपल्यावर आल्याबिगर राहणार नाही. अन् असं झाल्या शिवाय ह्या कारस्थानी आमदाराचं मन शांत होणार नाही. वेळीच सावध व्हा अन् कर्जाच्या फासामध्ये आपल्या काळया आईची मान अडकवू नका. त्याच्या भूलथापांना बळी पडुन सह्या करू नका!' असं खूप काहीबाही आमदाराविरुध्द उफनलं अन् सह्या न देता समदेजण पांगले.

पुढाऱ्यांच्या ह्या आपशी हेवेदाव्यापाई मात्र बोरवाडीकरांच कधीही न भरून निघणारं नुकसान झालं होतं. अजाणतेपणी न कळत त्यांनी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला होता.

आनंदा मात्र अजूनही आमदाराजवळच उभा होता अन् सुभानरावला न जुमानता निर्भीडपणे म्हणत होता.....

'आमदार साहेब, म्या तयार हाय, मपल्या शेतामधुन न्या पईप लहीन. माही सम्मती हाय कशावर सह्या पाह्यजे त्या घ्या! '

आमदारांनी बरोबरच्या माणसाला सांगून लागतील तीथं आनंदाच्या सह्या घेतल्या. त्याचवेळी त्यांनी त्याच्याकडे न्याहाळून पाहिले अन आपल्या मेमरीमध्ये आनंदाचे नांव ॲड केले. अन् आमदारांची गाडी धुराळा उडवित खानापूरच्या रस्त्याने निघून गेली. मात्र तेंव्हा पासून सुभानराव आनंदावर डूख धरून होता. अवघ्या सहा महिण्यातच ' जलसिंचन योजनेंतर्गत ' भली मोठी पाईप लाईन बनली अन् खानापूर, नांदापूर, चांदापूर शिवारात पाणी खेळू लागलं. पाईप लाईनच्या पाण्यावर अवघं शिवार हिरवगार झालं होतं. एकट्या आनंदाच्या सम्मतीनं काय फरक पडणार? अन् पाईप लाईन मात्र बोरवाडीची शेतं तहानलेली ठेऊन शिवावरून गेली. बोरवाडी शिवार भेगाळून पाण्यासाठी व्याकूळ होत होतं. काळया ढगाकडं पाहुन मयुरानं आनंदाने नाचण्याऐवजी रडावं तशी जित्राबांच्या पिण्याच्या पाण्यापायी रडण्याची पाळी बोरवाडीकरावर आली होती. मग शेतं पाण्यानं भिजण्याची तर गोष्टच सोडा !

एके दिवशी अचानक अंधारात पाईप लाईन कोणीतरी आनंदाच्या शेताच्या बांधाजवळच फोडली. पाण्याचा लोंढा वाटावाटानं वाहत जाऊन सिंदी नाल्याच्या 'विरोळयाच्या डोहात' उतरला होता. पाण्यानं काठोकाठ भरुन डुचमळला होता. ढोरागुरांच्या पिण्याच्या पाण्याचा पेच तरी तूर्त सुटला होता. सकाळीच आनंदा शेतात चकराला गेला. पाणी वाटानं वाहातच होतं. सुकत चाललेल्या कोवळया बाजरीच्या पीककडं पाहून त्याच्या जीवाची घालमेल होऊ लागली. वाहणाऱ्या पाण्याकडं पाहून त्याचा मोह अनावर झाला. मागचा पुढचा विचार न करता क्षणार्धात त्यानं वाटानं वाहून जाणारं पाणी शेतात वळवलं. शेतातल्या पीकाला पाणी पाजायला लागला. जसजसे पाणी शेतात फिरू लागले तसतसे पीक हिरवागार तजेला धरू लागलं. पाणी पिऊन तृप्त झालेलं हिरवंगार, टवटवीत पीक वाऱ्याच्या झुळके बरोबर डोलत होतं. ते पाहून आनंदाचं मन समाधानानं फुलत होतं.

मनात डूख धरून असलेल्या सुभानरावला हे सहन होईना गेलं. त्याने आनंदावर पाईप लाईन फोडल्याचं 'बालंट ' पाईप लाईनच्या सायबाला गुपचूप भेटून रचलं. सायबाचे कान भरले अन् सायबानबी आनंदावर 'पाईप लाइन फोडल्याचा दावा' पोलिसात गुदरवला. गावात पोलीसांची जाळीदार गाडी आली. फौजदाराने जुजबी पुस तपास केली अन् आनंदा

जीवाच्या आकांताने "म्या पाईप लाईन फोडल्याली न्हाई" ओरडून सांगत असतांनाही त्याचं काहीएक न ऐकता गाडीत घालुन नेलं.

हे सर्व मुकाट्यानं पाहणाऱ्या आनंदाच्या बायकोने -सरलानं प्रसंगाचं गांभीर्य मनोमन ओळखले. वेळ वाया न घालवता तिनं खुणेनं सासऱ्याला घरात बोलावले तसे पन्नाशीत असलेला बजाबा उतरलेल्या चेहऱ्यानं घरात शिरत कळवळून म्हणाला ' काय म्हणतीया पोरी आता? मले त काय बी सूचना झालं, तुच सांग काय तर उपाव ह्यावर आता !'

तशी सरला म्हाताऱ्याला म्हणाली "मामंजी, तुम्ही कायबी काळजी करू नका, सर्व काही नीट होईल पण तुम्हाला थोडी धावपळ करायला लागलं एवढेच."

तसा बजाबा अधीरपणाने बोलला " सांग सूनबाई, म्या काय करू म्हणतीया ?"

त्यावर सरला सांगु लागली "तुम्ही आताच्या आता खानापूरला जावा. आ.साहेब रावसाहेब बायजा मावशीचे धाकले दीर म्हणजे माझे काकाच की? त्यांच्या कानावर हे घाला. हे सारं बालंट आहे ह्यातून माह्या पोराला सोडवा म्हणावा ". अन् तीने बजाबाच्या हातात सर्व इत्यंभूत हकीगत लिहीलेली चिठ्ठी नीट घडी करुन देत खानापूरला पिटाळलं. थकलेल्या बजाबाच्या पायात एकाएकी चैतन्य संचारलं अन त्यानं हरणाच्या गतीने खानापूर गाठले.

बजाबा आ.रावसाहेबांच्या बैठकीत आला अन् दारातून हात जोडून "राम राम "म्हणतच बैठकीत शिरला तसे आमदार साहेबाजवळ खादीधारी कोनेदार टोप्या घातलेले घातलेली माणसं तेथुन हलली. तसे आमदारांनी हात जोडून' राम राम ' करून बजाबाला म्हणाले "या बाबा या,बसा ! "

नोकराला पाणी, चहा आणायला सांगितले. बजाबा कडे मान वळवित बोलले,' हं बोला बाबा, काय काम काढलत?' त्यावर सरलानं दिलेली चिठ्ठी बजाबाने त्यांच्या हातात दिली.

त्यांनी चिठ्ठी वाचल्यावर सर्व प्रकरण त्यांच्या लक्षात आलं तसं ते बजाबाला म्हणाले "तुम्ही आमचे पाहुणेच आहात, काही काळजी करू नका तुम्ही आता.मी सगळं काही ठीक करतो " असं म्हणत श्रीकृष्णाने सुदर्शन चक्र फिरवावं तसं फोनची तबकडी फिरवू लागले.

भिंतीवरील घड्याळाची टिकटिक अन् टेलीफोनची कर्रऽऽकर्र यांची जणू काही स्पर्धा लागली होती. फौजदाराशी बराच वेळ बोलल्यावर त्यांनी फोन बंद केला. चहापाणी आटोपून झाल्यावर त्यांनी ड्रायव्हरला बोलावून सांगितले "या आपल्या पाहुण्यांनां बोरवाडीला सोडुन या ! "

अन् बोरवाडीचे वेशीतून पोलीस गाडी आमदारांची गाडी एकामागून एक गावात शिरल्या अन् बजाबाच्या घराजवळ घरऽऽघर करीत थांबल्या. बजाबा आणि आनंदा या बाप-लेकांना घरी सोडून परत माघारी आल्या रस्त्याने निघून गेल्या.

दुसऱ्याच दिवशी पाइप लाइनच्या साहेबाच्या देखरेखीखाली आनंदाच्या शेतात पाईप लाईनचं पाणी सोडण्याची व्यवस्था करण्याचं काम सुरू झालं होतं. आता आनंदाचं शेत पाणी पिऊन तृप्त आणि समृद्ध होणार होतं !

सुभानराव मात्र ' विरोळयाच्या डोहात ' त्याचं पोरगं मनसोक्त बुटकळया मारून तापाने फणफणून अंथरूणात पडलं होतं म्हणून त्याच्या इलाजा करीता डॉक्टरकडे आनंदाच्या शेताजवळून जाताना नाक कापल्यागत खाली मान घालुन शरमिंदेपणानं चकरा मारीत होता __

... ... ... ... ... ... ... ... ... ..

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातून शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. मनावर होणारे परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भॆट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शॆजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहीतरी साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय

करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. विनामूल्य. हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान